संं.फौ.के.नं. २१९/२०२०

नि. क्र. ४८ लगत

**साक्षीदार क्र. ०४ चा उलटतपास**

**नाव** – सागर चंद्रकांत जाधव,

**वय**– ३० वर्षे, **व्यवसाय** – सध्या काही नाही, पुर्वी नोकरी,

**रा.** चाफवली, सरोदेवाडी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**साक्षीदार क्र. ०४ चा उलटतपास आरोपींतर्फे वकील श्रीम. पी. सी. चव्हाण यांचेकडून शपथेवर सुरु.**

१०. पोलीसांनी माझे तपास टिपण घेतले होते. मी पोलीसांना टिपण देतेवेळी **डबी उघडुन पाहीली असता** सोन्याचे दागीने दिसून आले, असा मजकुर सांगीतला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या टिपणात हा मजकुर नमुन नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या टिपणामध्ये, माझ्या आत्या वेदीका यादव यांनी पत्नीला शिवीगाळ केली, असा मजकुर नमुद नाही.

११. हे म्हणणे खरे आहे की, याच न्यायालयामध्ये माझी आत्या स्वाती यादव हीने खटला दाखल केला आहे. तो सध्या प्रलंबीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, या खटल्यामधील आरोपी माझे काका, काकी आणि दोन आत्या आहेत. हे मला माहीती नाही की, नि.फौ.खटल क्र. ०३/२०२१ मधील घटनेची तारीख दि. ०२/०८/२०२० हीच आहे अगर कसे. हे म्हणणे खरे आहे की, त्या खटल्यामध्ये मी आरोपी आहे. मी त्या खटल्याचे कागदपत्रे पाहीलेली नाहीत.

१२. हे मला माहीती नाही की, नि.फौ.खटला क्र. ०३/२०२१ आधी दाखल झाला व नंतर माझ्या पत्नीने हा खटला दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस स्टेशनला मी, माझी पत्नी, पोलीस पाटील, माझे चुलते असे सर्व एकत्र

गेलो होतो. माझ्या म्हणण्याप्रमाणे सकाळी ११.३० च्या सुमारास आम्ही पोलीस स्टेशनला गेलो होतो.

१३. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीस स्टेशनला गेलो त्यावेळी आरोपी क्र.१ ते ४ व माझी आजी तेथे पोलीस स्टेशनला हजर होते. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीस स्टेशनला गेलो त्या दिवशी साक्षीदार शशिकांत जाधव आणि शामल जाधव हे देखील पोलीस स्टेशनला आले होते.

१४. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पत्नीने माझे काका शशिकांत जाधव यांना आमच्या विरुध्द आरोपी क्र. १ ते ४ यांनी दाखल केलेल्या केस बाबत कल्पना दिली आणि मग फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.३ ने डबीतील सोन्या विषयी तक्रार देण्यास ती पोलीस स्टेशनाला आली आहे अशी माहीती मला फिर्याद देतेवेळी मिळाली होती. हे म्हणणे खरे आहे की, चोरीचे सोने मी पोलीसांच्या स्वाधीन केले.

१५. हे मला माहीती नाही की, आरोपी क्र.४ रत्नागिरीला स्थायिक आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.४ चाफवली येथे राहत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.३ प्राथमिक शिक्षिका आहे व तीचे चाफवली येथे स्वतंत्र घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ एस.टी. खात्यात कार्यरत असून ते रत्नागिरीला स्थायिक असतात.

१६. हे मला माहीती नाही की, आरोपी क्र.३ ने आरोपी क्र.४ कडे मालती जाधव यांनी दिलेले दागीने सुटकेसमध्ये ठेवण्याकरता दिले होते. हे मला माहीती नाही की, आरोपी क्र.३ चे असेही म्हणणे होते की, मालती यादव यांच्या दागीन्याबरोबर त्यांचे स्वतःचेही दागीने देखील सुटकेसमध्ये ठेवण्याकरता दिले होते. हे मला माहीती नाही की, चोरीच्या घटनेच्या विषयी स्वाती यादव यांचे म्हणणे होते

की, त्यांना केवळ त्यांचे दागीने मिळून आले व मालती जाधव यांचे दागीने मिळून आले नाहीत.

१७. हे मला माहीती नाही की, दि. ०१/०८/२०२० रोजी माझ्या खोलीमध्ये मिळून आलेले दागीने मालती जाधवचेच होते. हे मला माहीती नाही की, मी पोलीस स्टेशनमध्ये सुपुर्त केलेले दागीने मालती जाधव यांचे होते. माझ्या म्हणण्याप्रमाणे मी पोलीसांना चोरीचे दागीने म्हणून ते सुपुर्त केले.

१८. हे म्हणणे खरे आहे की, त्या दागीन्यांमध्ये एक सोन्याचे नेकलेस, एक सोन्याचा गोफ व एक वाघनख पेन्डंड, तीन अंगठया व बांगडी हा मुद्देमाल होता. हे मला माहीती नाही की, त्यामध्ये काही महत्वाची कागदपत्रे देखील होती.

१९. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील माझ्या लहानपणीच वारले. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई माझ्या दुस–या भावा बरोबर अलीप्त राहते. हे म्हणणे खरे नाही की, माझा सांभाळ आजी, आत्या व काका यांनी केला. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रेमविवाह केला होता. हे म्हणणे खरे नाही की, लग्नापुर्वी देखील माझी पत्नी घरी मला भेटायला यायची. हे म्हणणे खरे नाही की, या कारणावरुन गावामध्ये मिटींग देखील झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझे काका आरोपी क्र.१ या गोष्टीला विरोध करत होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या रागातुन माझ्या पत्नीने आरोपी क्र.१ ते ४ विरुध्द खोटी केस दाखल केलेली आहे.

२०. हे मला माहीती नाही की, शशिकांत जाधव व आरोपी क्र.१ यांच्या कुटुंबाशी बोलाचाली आहे अगर कसे. हे म्हणणे खरे आहे की, साक्षीदार शशिकांत जाधव रे.के.नं. ०३/२०२१ मध्ये आरोपी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, रे.के.नं. ०३/२०२१ मध्ये माझ्यावर डबीतील दागीने चोरल्याचे आरोप आहेत.

२१. हे म्हणणे खरे आहे की, चाफवलीतील आमच्या घरात स्वतंत्र खोल्या आहेत. माझ्या म्हणण्याप्रमाणे मी पोलीस पाटलांना दि. ०१/०८/२०२० रोजी रात्री

पावणे आठ ते आठच्या दरम्याने फोन केला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या विरुध्द दाखल रे.के.नं. ०३/२०२१ मधून निर्दोष मुक्तता होण्यासाठी माझ्या पत्नीला पुढे करुन मी ही खोटी केस दाखल केलेली आहे. हे मला माहीती नाही की, चाफवली येथील आमच्या घरात आरोपी क्र. १ ते ४ सन २०२० पासून येत नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, चाफवलीच्या घराच्या आजूबाजूला लोकवस्ती आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकुर खोटा आहे व आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2024.07.23 17:55:42 +0530

**(श्रीमती एस.एच.पाटील)**

**दिनांक – २२/०७/२०२४** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख.**